क्र.जिपना/साप्रवि/स्था.३/सिआर-..../२०/-----९८०५

कार्यालय :- जिल्हा परिषद, नागपुर

सामान्य प्रशासन विभाग

दिनांक :-२८एप्रिल २०२०

**वाचा :**

१) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र क्र.१२२/आस्था १४ दि.१५.०५.२०१४

२) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन पत्र क्र.जिपब-४८१६/(प्र.क्र.१३८/१६)आस्था.१४ दि.२२.०४.२०१६

३) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१७/ प्र.क्र.२२८/आस्था.१४ दि.०७.०३.२०१९

**प रि प त्र क :**

उपोद्घातात नमुद शासन तरतुदीनुसार **सन-२०२० मध्ये** सर्वसाधारण **स्थानांतर** जि.प. नागपूर अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाकडून नियंत्रीत वर्ग -३ चे अनुक्रमे **१)सहाय्यक प्रशासन अधिकारी २) कनिष्ठ प्रशासन अधिकारी ३) विस्तार अधिकारी (सां) ४) लघु लेखक (उच्च श्रेणी) ५) लघु लेखक (निम्न श्रेणी) ६) वरिष्ठ सहाय्यक (लिपीक वर्गीय) ७) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक वर्गीय)** या संवर्गातील एकाच मुख्यालयी **१० वर्ष व त्यापेक्षा अधिक सेवा** झालेल्या तसेच **आदिवासी क्षेत्रातंर्गत ३ वर्ष (अधिसुचित गाव घटक क्षेत्र)** व त्यापेक्षा अधिक सेवा झालेल्या बदली पात्र अधिकारी / कर्मचारी यांच्या संवर्ग निहाय तात्पुरती जेष्ठता यादया (कार्यरत सर्व कर्मचाऱ्यासह) या **सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.**

उपरोक्त संवर्ग निहाय वास्तव्य जेष्ठता यादया दर्शनी भागावर सुचना फलकावर प्रसिध्द करुन **संबधित अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन देण्याची जबाबदारी जि.प. स्तरावर संबधित कार्यालय प्रमुख व तालूका स्तरावर संबधित गट विकास अधिकारी यांचेवर सोपविण्यात** येत आहे, त्यांनी उक्त जेष्ठता यादी संबधित अधिकारी / कर्मचारी यांचा निदर्शनास आणुन त्याची लेखी पोंच कार्यालयीन अभिलेखात जतन करुन ठेवावी.

तसेच उपरोक्त संवर्ग निहाय वास्तव्य जेष्ठता यादीवर संबधित अधिकारी / कर्मचारी यांचे आक्षेप असल्यास सदहु आक्षेप **दिनांक २९.०४.२०२० सांय. ५:४५ पर्यंत जि.प. स्तरावर संबधित विभागास तथा तालूका स्तरावर गट विकास अधिकारी यांचे कार्यालयास स्विकारुन** त्याची नोंद वहीमध्ये नोंद घ्यावी. व त्यानुसार प्राप्त आक्षेपाची कार्यालयीन अभिलेखावरुन पडताळणी करुन आवश्यक अभिलेख तथा कार्यालय प्रमुखाचे स्वंयस्पष्ट अभिप्रायासह **दिनांक ३०.०४.२०२० ला सकाळी ११ :०० वाजता या कार्यालयास संबधित सहाय्यक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांनी सादर करावे.** विहीत मुदती नंतर प्राप्त आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही. याची जानिव संबधितास करुन दयावी.

त्याच प्रमाणे सदहू जेष्ठता यादीतील कर्मचाऱ्यांकडून प्राध्यान्याने बदलीसाठी ३ कार्यालयाचे **विकल्प परिशिष्ट-१ मधील नमुण्यात प्राप्त करुन** वरीलप्रमाणे या कार्यालयास **दिनांक ३०.०४.२०२०** ला सादर करावे.

तसेच उपरोक्त प्रमाणे बदली पात्र जेष्ठता यादी मध्ये त्यांचे कार्यालय / मुख्यालय अंतर्गत एकाच मुख्यालयी १० वर्ष व त्यापेक्षा अधिक सेवा झालेल्या तसेच आदिवासी क्षेत्रातंर्गत ३ वर्ष व त्यापेक्षा अधिक सेवा झालेल्या बदली पात्र सर्व अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश असल्याबाबत खातर जमा करावी व त्यामध्ये **बदली पात्र कर्मचाऱ्यांचे नांव वगळले असल्याचे वा काही बाबींची सुधारणा करण्याचे निदर्शनास आल्यास** संबधिताचे मुळ सेवा पुस्तकासह वरीलप्रमाणे यादीचे विवरण पत्रात माहीती तयार करुन **दिनांक ३०.०४.२०२० ला सकाळी ११ :०० वाजता** या कार्यालयास सादर करावी.

सदहू जबाबदारी संबधित कार्यालयाचे **सहाय्यक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांचेवर सोपविण्यात** येत आहे. त्यांनी त्यानुसार कार्यवाही करावी. यामध्ये कुठेही हयगय होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर बाब समुपदेशनाचे वेळेस निदर्शनास आल्यास याबाबतची जबाबदारी त्यांचेवर समप्रमाणात निश्चित करुन आवश्यकतेनुसार निलंबनाच्या कार्यवाहीसह गंभीर स्वरुपाची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे

**(योगेश कुंभेजकर, भा.प्र.से. )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**प्रतिलीपी :- (माहीतीस व योग्य कार्यवाहीस अग्रेषित.)**

१. खाते प्रमुख (सर्व)------------------------जि.प. नागपूर
२. गट विकास अधिकारी/गट शिक्षणाधिकारी, ,पंचायत समिती (सर्व)-----------------
३. बाल विकास प्रकल्प अधिकारी , ए.बा.वि.से.यो. ----------------------------------
४. तालूका वैद्यकिय अधिकारी (सर्व)-------------------------------------------
५. उप विभागीय अभियंता जि.प.बांध./सिंचाई/ग्रा.पा.पू. उपविभाग,(सर्व)----------------
६. मुख्याध्यापक, जि.प. हायस्कुल (सर्व) ------------------------------------------
७. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व)-------------------------------

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपुर